# अवकाश तंत्रज्ञान संशोधनाबाबत शिवाजी विद्यापीठाचा सामंजस्य करार

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**कोल्हापूर** : अवकाशविषयक तंत्रज्ञान संशोधनात आघाडीवर असलेल्या पश्चिम बंगालमधील बरद्वान विद्यापीठासमवेत शिवाजी विद्यापीठाने सामंजस्य करार केला. ऑनलाइन पद्धतीने हा कार्यक्रम झाल्याची माहिती मंगळवारी देण्यात आली.

कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के म्हणाले, की दोन्ही विद्यापीठांतील विविध अधिविभागांनी पुढे येऊन हे शैक्षणिक व संशोधनविषयक सहकार्य वृद्धिंगत करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केल्यास त्याची अधिक उत्तम फळे मिळतील. बरद्वान विद्यापीठाचे प्र–कुलगुरू डॉ. ए. के. पाणिग्रही म्हणाले, की अवकाश संशोधनाच्या अनुषंगाने विदा विश्लेषणात शिवाजी विद्यापीठाची कामगिरी उच्च दर्जाची आहे. या सहकार्य करारामुळे दोन्ही विद्यापीठांचा अवकाश संशोधनातील लौकिक वाढीस लागेल.

# शिवाजी विद्यापीठाचा बरद्वान विद्यापीठाशी सामंजस्य करार

## 'ग्लोबल सॅटेलाईट बेस्ड नेव्हिगेशन सिस्टीम'बाबत होणार संशोधन



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ व बरद्वान विद्यापीठ सामंजस्य कराराप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर. (छाया : पप्पू अत्तार)

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

अवकाशविषयक तंत्रज्ञान व ग्लोबल सॅटेलाईट बेस्ड नेव्हिगेशन सिस्टीम (जी.एन.एस.एस.) यांच्या संशोधनात आघाडीवर असलेल्या पश्चिम बंगालमधील बरद्वान विद्यापीठासमवेत शिवाजी विद्यापीठाने सामंजस्य करार केला. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत सोमवारी ऑनलाईन कार्यक्रम झाला.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, जीएनएसएसविषयक संशोधन सहकार्याने सुरुवात होत असली तरी तेवढ्यापुरताच हा करार मर्यादित राहू नये. दोन्ही विद्यापीठांतील विविध अधिविभागांनी पुढे येऊन हे शैक्षणिक व संशोधनविषयक सहकार्य वृद्धिंगत करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावे.

बरद्वान विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. ए. के. पाणिग्रही म्हणाले, या करारामुळे दोन्ही विद्यापीठांचा अवकाश संशोधनातील लौकिक निश्चितपणे वाढीस लागेल. प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, अवकाश संशोधनाबरोबरच पदार्थविज्ञानाच्या क्षेत्रात संशोधनाच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. त्यात भूपृष्ठीय हवामान, अवकाशीय हवामान, वातावरणातील बदल, भूचुंबकत्व आदी अनेक अनुषंगिक क्षेत्रे आहेत. त्यादृष्टीने करार महत्त्वाचा आहे.

### असा आहे सामंजस्य करार

पश्चिम बंगालमधील बरद्वान विद्यापीठात जी.एन.एस.एस. संदर्भात प्रशिक्षण व संशोधनासाठी स्वतंत्र प्रयोगशाळा विकसित करण्यात आली आहे. शिवाजी विद्यापीठाचे अवकाश संशोधन केंद्र (एस.आर.सी.) हे सुद्धा अवकाश संशोधनासाठी विशेषतः डाटा विश्लेषणाच्या बाबतीत आघाडीवर आहे. भूपृष्ठीय वातावरणीय बदलांच्या संशोधनाच्या बाबतीत शिवाजी विद्यापीठ अग्रेसर आहे. या कराराअंतर्गत दोन्ही विद्यापीठे जी.एन.एस.एस. च्या अनुषंगाने शैक्षणिक व संशोधनपर सहकार्य करणार आहेत. डाटा एक्स्चेंजबरोबरच शोधनिबंध प्रकाशने होणार आहेत.

सामंजस्य करारावर कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी तर बरद्वान विद्यापीठातर्फे कुलसचिव डॉ. अभिजित मझुमदार यांनी स्वाक्षरी केल्या. यावेळी विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, बरद्वान विद्यापीठाच्या विज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पी. के. चक्रवर्ती यांनी मनोगत व्यक्त केले. पदार्थविज्ञान अधिविभागाचे प्रमुख डॉ. के. वाय राजपुरे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. राजीव व्हटकर, बरद्वान विद्यापीठाचे डॉ. अनिंद्य बोस यांनी सामंजस्य कराराचे समन्वयक म्हणून काम पाहिले.

# दृष्टी सक्षम करणारे सोलर सेलचे संशोधन

नंदिनी नरेवाडी-पाटोळे :
सकाळ वृत्तसेवा

**आम्ही कोल्हापुरी**



डॉ. व्हनाळकर

कोल्हापूर, ता. १९ : वाढत्या वयानुसार व्यक्तीच्या दृष्टीमध्ये फरक जाणवायला लागतो. प्रकाशाचे रूपांतर विद्युत ऊर्जेत करून ती ऊर्जा मेंदूकडे पाठविण्याचे काम डोळ्यांतील रेटिनल मज्जातंतुकडून केले जाते. डोळ्यांच्या दृष्टिपटलातील हा रेटिना कुमकुवत होऊन त्याचा दृष्टीवर परिणाम होतो. यावर पर्याय शोधत सोलर सेलचा मानवी डोळ्यांत वापर करून दृष्टी सक्षम करण्याचे संशोधन कोल्हापुरातील एका युवकाने केले आहे. प्राथमिक अवस्थेत उंदरावरील प्रयोग यशस्वीही झाला आहे. तुर्की देशातील कोच विद्यापीठातील संशोधनात निगवे खालसा (करवीर) येथील डॉ. शरदराव आनंदराव व्हनाळकर यांचा मोलाचा वाटा आहे.

डॉ. व्हनाळकर यांचे महाविद्यालयीन शिक्षण गोखले कॉलेजमध्ये झाले. शिवाजी विद्यापीठातून भौतिकशास्त्र विषयात एमएस्सी पूर्ण केल्यानंतर 'कॉन्टम डॉट सेन्सटाईज्ड सोलर सेल' या विषयात पीएच. डी. मिळवली. प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांचे त्यांना मार्गदर्शन मिळाले. यामध्ये वापरल्या जाणाऱ्या लिक्विड मटेरियलमुळे ऊर्जानिर्मितीच्या प्रक्रियेत काही समस्या निर्माण होतात. त्याचवेळी घन पदार्थांपासून जर सौरघट तयार करताना सीझेडटीएस धातू व अधांतूचे मिश्रण वापरल्यास ही प्रक्रिया सोपी होते, हे सिद्ध केले. त्यांना युजीसीची रमण फेलोशिप मिळाली. या फेलोशिपमध्ये त्यांना अमेरिकेत संशोधन करण्याची संधी मिळाली. तेथील आयवा स्टेट युनिव्हर्सिटीमध्येही त्यांनी काही काळ 'परस्काईट सोलर सेल' वर संशोधन केले. त्यानंतर २०१९ मध्ये त्यांना तुर्की सरकाराकडून टुबी टॅक फेलोशिप मिळाली. याच्या माध्यमातून त्यांनी सोलर सेलचा मानवी डोळ्यांतील वापर या विषयातून संशोधन करत आहेत. प्रा. सेदात नेजामाबिलू यांच्यासोबत हे संशोधन सुरू आहे. सध्या ते गारगोटीतील कर्मवीर हिरे महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत.

# अवकाश संशोधनास मिळणार ताकद

## पश्चिम बंगालच्या विद्यापीठाबरोबर शिवाजी विद्यापीठचा करार : 'ग्लोबल सॅटेलाईट' सिस्टीमसंदर्भात संशोधन होणार

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

अवकाशविषयक तंत्रज्ञान आणि ग्लोबल सॅटेलाईट बेस्ड नेव्हिगेशन सिस्टीम (जी.एन.एस.एस.) यांच्या संशोधनात आघाडीवर असलेल्या पश्चिम बंगालमधील बरद्वान विद्यापीठाबरोबर शिवाजी विद्यापीठाने सामंजस्य करार केला. ऑनलाईन पद्धतीने कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम झाला.

बरद्वान विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. ए. के. पाणिग्रही म्हणाले, शिवाजी विद्यापीठाबरोबर झालेल्या सामंजस्य करारातून अवकाश संशोधनाच्या अनुषंगाने काही चांगले संशोधन प्रकल्प हाती घेता येतील. डॉ. शिर्के म्हणाले, दोन्ही विद्यापीठांतील अधिविभागांनी पुढे येऊन शैक्षणिक व संशोधनविषयक देवाण घेवाण करावी. यातून काही चांगले शोधनिबंध आकाराला येतील. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, पदार्थविज्ञानात भूपृष्ठीय, अवकाशीय हवामान, वातावरणातील बदल, भूचुंबकत्वाचा सूक्ष्म अभ्यास करता येईल. सामंजस्य करारावर शिवाजी विद्यापीठाच्या वतीने कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी तर बरद्वान विद्यापीठाच्या वतीने कुलसचिव डॉ. अभिजीत मझुमदार यांनी स्वाक्षरी केल्या. यावेळी विज्ञान, तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, बरद्वान विद्यापीठाच्या विज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पी. के. चक्रवर्ती, पदार्थविज्ञान अधिविभागप्रमुख डॉ. के. वाय राजपुरे, डॉ. राजीव व्हटकर, डॉ. अनिंद्य बोस आदी उपस्थित होते.



**कोल्हापूर : पश्चिम बंगालमधील बरद्वान विद्यापीठाबरोबर शिवाजी विद्यापीठाने सामंजस्य करार केला. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर.**

**असा आहे सामंजस्य करार**

पश्चिम बंगालमधील बरद्वान विद्यापीठात जीएनएसएससंदर्भात प्रशिक्षण व संशोधनासाठी स्वतंत्र प्रयोगशाळा आहे. शिवाजी विद्यापीठाचे अवकाश संशोधन केंद्र (एस.आर.सी.) अवकाश संशोधनासह डाटा विश्लेषणासाठी आघाडीवर आहे. इस्रोच्या आय.आर.एन.एस.एस. या उपग्रहाचा रिसिव्हर पन्हाळा येथील उपकेंद्राच्या ठिकाणी कार्यान्वित आहे. भूपृष्ठीय वातावरणीय बदलांच्या संशोधनात विद्यापीठ अग्रेसर आहे. अस्तित्वातील व भविष्यातील जी.एन.एस.एस. तंत्रज्ञानाच्या अभ्यासासाठी विद्यापीठातील अवकाश संशोधन केंद्र आणि बरद्वान विद्यापीठाचे जीएनएसएस संशोधन केंद्र एकमेकांना जी.एन.एस.एस. च्या अनुषंगाने शैक्षणिक व संशोधनपर सहकार्य करणार आहेत.

# विद्यापीठ परिसरात १२३ पृष्ठवंशीय प्रजातींची नोंद

## पक्षांच्या ९० प्रजातींचा अधिवास : ९ सस्तन प्रजातींचाही समावेश : परिसर जैवविविधतेने समृद्ध

**शिवाजी विद्यापीठ परिसरात १२३ पृष्ठवंशीय पशुपक्ष्यांच्या प्रजातींची नोंद करण्यात आली आहे. विद्यापीठाच्या 'रिसर्च स्ट्रेन्दनिंग स्कीम' अंतर्गत प्राणीशास्त्र अधिविभागातील डॉ. एस. एम. गायकवाड यांना मंजूर करण्यात आलेल्या प्रकल्पांतर्गत गेल्या वर्षभरात या नोंदी केल्या आहेत. या संशोधनाचा अहवाल विद्यापीठात केला आहे. अहवालानुसार विद्यापीठ परिसरात मोठ्या प्रमाणात जैववैविविधता असल्याचे दिसून आले. कुलगुरू डॉ. शिर्के यांनी या संशोधनाचे कौतुक केले.**

प्रतिनिधी

कोल्हापूर

'रिसर्च स्ट्रेन्दनिंग स्कीम' विद्यापीठ अधिविभागातील संशोधकांसाठी घोषित केली आहे. या योजनेअंतर्गत 'स्टडिज ऑन डायव्हर्सिटी ऑफ व्हर्टिब्रेट्स इन द शिवाजी युनिव्हर्सिटी कॅम्पस, कोल्हापूर (महाराष्ट्र, इंडिया)' हा प्रकल्प डॉ. एस. एम. गायकवाड यांना मंजूर करण्यात आला होता. या प्रकल्पांतर्गत डॉ. एस. एम. गायकवाड यांनी विद्यापीठ परिसरातील सरपटणारे सापांमधील दुर्मिळ प्रजात तस्कर (कॉमन ट्रिंकेट स्नेक), सरडे, पाली, कासवाच्या प्रजाती. पक्ष्यांमध्ये थापट्या बदक, शुवई बदक, ब्राह्मणी बदक, छोट्या कंठाचा चिखल्या व स्वर्गीय नर्तक या पाच स्थलांतरित प्रजातींसह गरुडाच्या ही बोनेल्स ईगल आणि क्रेस्टेड सर्पंट ईगल अशा ९० प्रजातींचा अभ्यास केला. उभयचर प्राण्यांमध्ये बेडूक, बलून फ्रॉगसह ११ प्रजातींचा अभ्यास केला. सस्तन प्राण्यांमध्ये वटवाघळ, साळिंदरासह ९ प्रजातींचा संशोधनासाठी अभ्यास केला आहे. डॉ. गायकवाड यांच्या या संशोधन अहवालामुळे शिवाजी विद्यापीठ परिसरात असणाऱ्या अने दुर्मिळ जैवविविधतेचा शोध लागण्यास मदत झाली असून विद्यापीठ जैवविविधतेने समृद्ध असल्याचे या अहवालातून स्पष्ट झाले आहे.



### विद्यापीठ परिसर जैवविविधतेने समृध्द

शिवाजी विद्यापीठाचा परिसर जैवविविधतेने किती समृद्ध आहे, याची प्रचिती या प्रकल्पाचे काम करताना आली. विद्यापीठाने प्रदान केलेल्या रिसर्च स्ट्रेन्दनिंग स्कीममुळेच हे संशोधन करणे शक्य झाले. या संशोधनाचा सविस्तर अहवाल विद्यापीठास सादर केला आहे. भविष्यात या संदर्भात अधिक व्यापक संशोधन करण्याचा मानस आहे.

**संशोधक डॉ. एस. एम. गायकवाड**








# मराठीचे विद्यार्थी लिहतात ही अभिमानाची गोष्ट

## डॉ. बी.एम.हिर्डेकर : पधारो म्हारो देस, मराठी पोवाडा पुस्तकाचे प्रकाशन

प्रतिनिधी
कोल्हापूर

प्रवास वर्णन आणि संशोधनाअंती मराठी पोवाड्याविषयी लिहलेली पुस्तके मराठी साहित्य क्षेत्रात दिशादर्शक आहेत. विद्यापीठातील मराठी अधिविभागाचे केवळ शिक्षकच नव्हे, तर विद्यार्थी सुद्धा लिहीताहेत, ही अभिमानाची बाब आहे, असे गौरवोद्गार शिवाजी विद्यापीठाचे माजी परीक्षा नियंत्रक डॉ. बी. एम. हिर्डेकर यांनी काढले.

शिवाजी विद्यापीठ आणि महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा पंधरवडा साजरा होत आहे. या कार्यक्रमांतर्गत लेखक विष्णू पावले यांच्या 'पधारो म्हारो देस' आणि डॉ. सयाजी गायकवाड यांच्या 'मराठी पोवाडा (तीन भाग)' या पुस्तक प्रकाशनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थित होती.



**कोल्हापूर : 'पधारो म्हारो देस' व डॉ. सयाजीराव गायकवाड यांच्या 'मराठी पोवाडा' या पुस्तकाचे प्रकाशन करताना डॉ. बी. एम. हिर्डेकर, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील आदी.**

'पधारो म्हारो देस' डॉ. हिर्डेकर म्हणाले, पावले यांनी पधारो म्हारो देस या प्रवास वर्णनात ओघवती भाषा, नर्मविनोदी शैली अधूनमधून डोकावते. त्यांच्या भाषेचा बाज उत्तम आहे. डॉ. गायकवाड यांनी'मराठी पोवाडा (तीन भाग)' या ग्रंथाच्या निर्मितीमुळे पोवाड्याचा इतिहास, वर्तमान आणि भविष्य असा सर्वंकष दस्तावेज मराठी समाजाच्या हाती आला आहे. अध्यक्षस्थानावरून कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, दोन्ही ग्रंथांचे विषय वेगवेगळे असले तरी मराठी अधिविभागाच्या माजी विद्यार्थ्यांनी लिहले आहेत, याबद्दल कौतुक केले. मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी आभार मानले. सुश्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, लेखक विष्णू पावले, डॉ. सयाजीराव गायकवाड आदी उपस्थित होते.

# मराठी भाषेच्या निरंतर सेवेत राहा

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के : मराठी भाषा संवर्धन पंधरवडा उपक्रमास सुरुवात

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

मराठी शिकणारे सर्व विद्यार्थी या भाषेच्या निरंतर सेवेत राहतील याची दक्षता सर्वांगाने घेतली जाईल, तेव्हाच मराठी भाषेचे खऱ्या अर्थाने संवर्धन होईल, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचा मराठी अधिविभाग, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने साजऱ्या करण्यात येत असलेल्या मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याच्या निमित्ताने मंगळवारी कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते 'मराठी भाषा व अर्थार्जनाच्या संधी' आणि 'दृष्टांतपाठ : निवडक दृष्टांत' या बी. ए. भाग-३च्या दोन क्रमिक पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते. यावेळी डॉ. दत्ता पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विद्यार्थी ज्या विषयाचे शिक्षण घेतो आहे त्याला त्या क्षेत्रातील संधींची माहिती दिली जावी, अशी अपेक्षा नव्या शैक्षणिक धोरणात व्यक्त करण्यात आली आहे. विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाने 'अर्थार्जनाच्या संधी' विषयीचे क्रमिक पुस्तकच विद्यार्थ्यांना सादर करून या अपेक्षेची पूर्तता केली आहे, ही महत्त्वाची बाब आहे.

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, अभ्यासक्रमाचे रूपांतर एका दर्जेदार क्रमिक पुस्तकात करण्याचे काम मराठी अभ्यास मंडळाने केले आहे. विद्यार्थ्यांपर्यंत सर्वंकष ज्ञान पोहोचविण्याचा हा प्रयत्न कौतुकास्पद आहे. दरम्यान, मान्यवरांच्या हस्ते लेखक डॉ. अर्जुन चव्हाण, डॉ. ए. एम. गुरव, प्रा. नानासाहेब जामदार, डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. आलोक जत्राटकर, डॉ. कोमल कुंदप, योगीराज बच्चे यांचा ग्रंथभेट देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे नियोजन अभ्यास मंडळाच्या उपकुलसचिव संध्या अडसुळे आणि विभागातील सहकाऱ्यांनी केले. सुश्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले; तर डॉ. नंदकुमार मोरे यांनी आभार मानले. कार्यक्रमास डॉ. शहाजी पाटील, डॉ. सुभाष जाधव, डॉ. गोपाळ गावडे, डॉ. संदीप कंदले, प्राचार्य डॉ. प्रकाश कुंभार, डॉ. नितीश सावंत, डॉ. नामदेव मोरे, डॉ. सर्जेराव जाधव, डॉ. एकनाथ पाटील, लेखक संपत मोरे आदी उपस्थित होते.

शिवाजी विद्यापीठ- बरद्वान विद्यापीठाशी सामंजस्य करार

# विद्यापीठात जीएनएसएसबाबत संशोधन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठ आणि पश्चिम बंगालमधील बरद्वान विद्यापीठ संयुक्तपणे अवकाशविषयक तंत्रज्ञान, ग्लोबल सॅटेलाईट बेस्ड नेव्हिगेशन सिस्टीम (जी.एन.एस.एस.) बाबत संशोधन करणार आहेत. त्यासाठी या दोन्ही विद्यापीठांमध्ये सोमवारी (दि. १८) सामंजस्य करार झाला.

ऑनलाईन स्वरूपात सामंजस्य कराराचा कार्यक्रम झाला. सुरुवात 'जीएनएसएस' विषयक संशोधन सहकार्याने होत असली तरी केवळ तेवढ्यापुरताच हा करार मर्यादित राहू नये, तर दोन्ही विद्यापीठांतील विविध अधिविभागांनी पुढे येऊन हे शैक्षणिक, संशोधनविषयक सहकार्य वृद्धिंगत करण्याच्या दृष्टीने प्रयत्न व्हावेत, असे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी सांगितले. अवकाश संशोधनाच्या अनुषंगाने डाटा विश्लेषणात शिवाजी विद्यापीठाची कामगिरी उच्च दर्जाची आहे. या करारामुळे दोन्ही विद्यापीठांचा अवकाश संशोधनातील लौकिक निश्चितपणे वाढीस लागेल. संशोधन प्रकल्प संयुक्तपणे राबविले जातील, असे बरद्वान विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. ए. के. पाणिग्रही यांनी सांगितले.

या करारावर शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, बरद्वान विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अभिजित मझुमदार यांनी स्वाक्षरी केल्या. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, बरद्वान विद्यापीठाच्या विज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पी.के. चक्रवर्ती यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. राजीव व्हटकर, अनिंद्य बोस यांनी सामंजस्य कराराचे समन्वयक म्हणून काम पाहिले.

## शैक्षणिक सहकार्य

बरद्वान विद्यापीठामध्ये 'जी.एन.एस.एस.' संदर्भात प्रशिक्षण व संशोधनासाठी स्वतंत्र प्रयोगशाळा आहे. शिवाजी विद्यापीठाचे अवकाश संशोधन केंद्र (एस.आर.सी.) हेसुद्धा अवकाश संशोधनासाठी विशेषतः डाटा विश्लेषणाच्या बाबतीत आघाडीवर आहे. इस्रोच्या आय.आर.एन.एस.एस. या उपग्रहाचा रिसिव्हर विद्यापीठाच्या पन्हाळा येथील उपकेंद्राच्या ठिकाणी कार्यान्वित आहे. सद्यस्थितीत अस्तित्वात असलेल्या, भविष्यातील जी.एन.एस.एस. तंत्रज्ञानाच्या अनुषंगाने अभ्यास करण्यासाठी शिवाजी विद्यापीठातील पदार्थविज्ञान विभागाचे अवकाश संशोधन केंद्र आणि बरद्वान विद्यापीठाचे जीएनएसएस संशोधन केंद्र यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. याअंतर्गत दोन्ही विद्यापीठे एकमेकांना जी.एन.एस.एस.च्या अनुषंगाने शैक्षणिक व संशोधनपर सहकार्य करणार आहेत.

